30 AUG 2004
18248

(33)

विषय : शासनाने औद्योगिक, वाणिज्यिक तसेच निवासी प्रयोजनासाठी मंजूर केलेल्या जमिनीवरील इमारतीतील जागेची औद्योगिक (Industrial) वाणिज्यिक (Commercial) वापरातील जागेची, सदनिकांची विक्री/हस्तांतर करणे अथवा भाड्याने देण्यास परवानगी देतांना आकारावयाचे हस्तांतरण शुल्क तथा अनुज्ञप्ती फीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय** क्र.एलबीएल-१००२/प्र.क्र.१५४/ज-२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २४ ऑगस्ट, २००४

**वाचा :** शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.२५२०००/१७५७५६/प्र.क्र.९६३/ज-२ दिनांक २३/११/२००१

**प्रस्तावना :-** शासनाने निरनिराळ्या प्रयोजनासाठी शासकीय जमीन भाडेपट्ट्याने अथवा कब्जेहक्काने दिलेल्या जमिनीवरील इमारतीमधील जागा विक्री/हस्तांतरण करणे तथा भाड्याने देण्यास परवानगी देण्याबाबत, शासन निर्णय क्र.एलबीआर-२५२०००/१७५७५६/ प्र.क्र.९६३/ज-२ दि.२३/११/२००१ अन्वये धोरण ठरविले आहे. त्यामध्ये मुंबई शहर तथा मुंबई उपनगर जिल्ह्याबाबत एकच हस्तांतरण शुल्क/अनुज्ञप्ती फी निश्चित करण्यात आली होती. तथापि, मुंबई शहरातील आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील जागेच्या किंमतीमध्ये बरीच तफावत असल्याने उपनगरातील जागेच्या विक्री/हस्तांतरण तथा भाड्याने देण्यासाठी आकारावयाच्या हस्तांतरण शुल्क तथा अनुज्ञप्ती फीबाबत सुधारणा करण्याचा प्रस्ताव तसेच दि.२३/११/२००१ मधील तरतुदी निवासी प्रयोजनासाठी मंजूर केलेल्या जमिनीवरील इमारतीमधील जागेसाठी लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**निर्णय :** " औद्योगिक, वाणिज्यिक व निवासी प्रयोजनासाठी मंजूर केलेल्या शासकीय भूखंडावरील खाजगी व्यक्तींनी, संस्थांनी तसेच निवासी संस्थानी अथवा विकासकांनी बांधलेल्या इमारतीच्या पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर इमारतीमधील जागेची विक्री/हस्तांतरण करण्यास अथवा भाड्याने देण्यास हरकत नसावी. भाडेपट्ट्याने अथवा कब्जेहक्काने मंजूर केलेल्या भूखंडावरील इमारतीमधील, औद्योगिक तथा वाणिज्यिक वापरातील जागा हस्तांतरण करण्यास अथवा भाड्याने देण्यास परवानगी देतांना आकारावयाची हस्तांतरण फी आणि अनुज्ञप्ती फी पुढीलप्रमाणे राहील :-

१) इमारतीमधील जागेची विक्री/हस्तांतरणास परवानगी देतांना पुढीलप्रमाणे हस्तांतरण फी/अनुज्ञप्ती फी आकारण्यात यावी.

| अ.क्र. | ठिकाण/क्षेत्र | विक्री हस्तांतरण फी चा प्रती चौ.फुटाचा दर (रुपयात) | |
|---|---|---|---|
| | | औद्योगिक | वाणिज्यिक |
| १ | मुंबई शहर जिल्हा | १,००० | १,५०० |
| २ | मुंबई उपनगर जिल्हा | ५०० | ७५० |
| ३ | वरील (१) येथील क्षेत्राव्यतिरिक्त इतर महानगरपालिका क्षेत्र | ४०० | ६०० |
| ४ | वरील १,२ व्यतिरिक्त इतर नगरपालिका क्षेत्र | २०० | ३०० |
| ५ | ग्रामीण क्षेत्रासाठी | ५० | ७५ |

क्रमशः

Scanned with CamScanner

२. सदर जागा भाड्याने/पोट भाड्याने देताना औद्योगिक वापराच्या जागेसाठी वरीलप्रमाणे होणाऱ्या हस्तांतरण फीच्या १० टक्के प्रमाणे आणि वाणिज्यिक वापरासाठी भाड्याने देताना हस्तांतरण फीच्या १२.५ टक्के दराने प्रतिवर्षी अनुज्ञप्ती फी आकारण्यात यावी.

३. या संबंधिच्या मूळ शासन निर्णय दि.२३/११/२००१ मधील परि.(३) ते (१०) मधील इतर सर्व तरतुदी आहेत तशा लागू राहतील. तसेच, हे आदेश ज्या प्रकरणी हस्तांतरण फी/अनुज्ञप्ती फी अद्याप भरलेली नाही अशा अनिर्णित प्रकरणामध्ये लागू करण्यात यावेत.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.८५६/०४/व्यय-९ दि.२४/८/२००४ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(ज. का. घरत)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,
१) जिल्हाधिकारी मुंबई शहर,
जुने जकात घर, मुंबई - ०१.
२) जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा,
बांद्रा (पूर्व), मुंबई - ५१.

प्रतिलिपी:
१) जमाबंदी आयुक्त, व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सर्व निवासी उपजिल्हाधिकारी,
३) सर्व सहाय्यक संचालक, नगररचना
४) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
५) वित्त विभाग (व्यय -९), मंत्रालय, मुंबई - ३२
६) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
७) ज-गटातील सर्व कार्यासन अधिकारी, मंत्रालय, मुंबई - ३२
८) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
९) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
१०) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
११) प्रधान सचिव (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
१२) निवडनस्ती ज-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२